## नगर दिवाणी व सत्र न्यायालय, मुंबई व मुंबई जिल्हा विधी सेवा प्राधिकरण यांच्या संयुक्त विद्यमाने

## मराठी भाषा संवर्धन पंधरवडा — २०२६ निमित्त आयोजित

## निबंधलेखन स्पर्धेचा निकाल

| प्रवेशिका क्रमांक | स्पर्धकाचे नाव | पदनाम | न्यायालय क्र. /विभागाचे नाव | निकाल |
|---|---|---|---|---|
| नि—१७ | श्री सुशिल रमेश होडबे | शिपाई | देखभाल विभाग | प्रथम |
| नि—३८ | श्रीमती धनश्री धनंजय राजिगरे | लिपिक—टंकलेखक | न्यायालय क्र. ०९, दिंडोशी न्यायालय | व्दितीय |
| नि—११ | श्री मोहन सुरेश जयकारे | हमाल | लेखा विभाग | तृतीय |
| नि—१ | कुमारी श्वेता हरेश मुळम | लिपिक—टंकलेखक (कंत्राटी) | सरकारी वकील विभाग, नगर दिवाणी व सत्र न्यायालय, मंबई | उत्तेजनार्थ |
| नि—३३ | श्री. प्रविण द्वा. दळवी | शिपाई | कोर्ट क्र. २७ | उत्तेजनार्थ |
| नि—२१ | विनया विनीत मोहिते | दुभाषी | न्यायालय क्र. ८३, माझगाव न्यायालय | उत्तेजनार्थ |

दिनांक :

28.02.2026.

(श्री चकोर बाविस्कर)
अतिरिक्त सत्र न्यायाधीश

(श्री सुनिल पाटील)
अतिरिक्त सत्र न्यायाधीश

# कुसुमाग्रज आणि मी.

'कुसुमाग्रज आणि मी' हा विषय केवळ एका कवीबद्दल लिहिणे नसून, एका समृद्ध सांस्कृतिक वारशाशी जोडले जाणे आहे. वि.वा शिरवाडकर उर्फ 'कुसुमाग्रज' हे नाव उच्चारले की डोळ्यासमोर उभी राहते ती धगधगती शब्दशक्ती आणि माणुसकीचा ओलावा जपणारे थोर व्यक्तिमत्व.

माझी आणि कुसुमाग्रजांची पहिली भेट शालेय पाठ्यपुस्तकात झाली. 'कणा' ही कविता वाचताना अंगावर जो शहारा आला, तो आजही कायम आहे. "मोडून पडला संसार तरी मोडला नाही कणा,
पाठीवरी हात ठेवून फक्त लढ म्हणा!".
या ओळींनी मला आयुष्यातल्या संकटांकडे बघण्याची एक नवीन दृष्टी दिली. संकटे येतील आणि जातील, पण आपला स्वाभिमान आणि लढण्याची वृत्ती शाबूत असली पाहिजे, हा धडा मला कुसुमाग्रजांनीच शिकवला.

कुसुमाग्रजांचे साहित्य म्हणजे केवळ शब्दरचना नसून ते मानवी भावनांचे प्रतिबिंब आहे. जेव्हा मी त्यांचे 'नटसम्राट' हे नाटक वाचले, तेव्हा मला म्हातारपणातील अगतिकता आणि मानवी स्वभावातील क्रूरता यांमधील द्वंद्व समजले. "कुणी घर देता का घर?" ही आर्त हाक माझ्या काळजाला भिडली. एका लेखकात किती ताकद असू शकते, की तो एका पात्राच्या माध्यमातून संपूर्ण समाजाला आरसा

दाखवू शकलो, याचे नवल मला आजही वाटते.

त्यांच्या कवितांमधील ओज आणि माधुर्य दोन्ही थक्क करणारे आहे. एकीकडे 'विशाखा'मधील क्रांतीची ज्वाला पेटवणारे शब्द आहेत, तर दुसरीकडे निसर्गाचे आणि प्रेमाचे हळवे वर्णन करणारी गाणी आहेत. त्यांच्या लेखणीत एक प्रकारची राजबिंडी भव्यता आहे, जी वाचकाला स्वतःच्या क्षुद्रपणातून बाहेर काढून एका मोठ्या विश्वाचा भाग बनवते.

कुसुमाग्रज माझ्यासाठी केवळ एक साहित्यिक नाहीत, तर ते एक मार्गदर्शक आहेत. जेव्हा कधी मला नैराश्य येते, तेव्हा मी त्यांच्या कविता वाचतो. त्यांच्या शब्दांमधून मिळणारी ऊर्जा कोणत्याही 'मोटिव्हेशनल' भाषणापेक्षा जास्त प्रभावी असते.

"माझ्या मराठीची गोडी, मला वाटते अवीट,
जशी अमृताची धार, तशी शब्दांची ही वीट"

त्यांनी मराठी भाषेला जे वैभव प्राप्त करून दिले, त्यामुळे मला माझ्या मातृभाषेचा अभिमान वाटू लागला. 'मराठी राजभाषा दिन' हा त्यांच्या जन्मदिनी साजरा होतो, हे पाहून ऊर अभिमानाने भरून येतो.

त्यांच्या व्यक्तिमत्त्वामधील विनम्रता हा गुण मला विशेष भावतो. इतका मोठा सन्मान, 'ज्ञानपीठ' सारखा सर्वोच्च पुरस्कार मिळूनही ते शेवटपर्यंत नाशिकच्या आपल्या घरात एका साध्या

माणसासारखे राहिले "सरस्वतीचा हा लाडका पुत्र असूनही त्यांचे पाय जमिनीवरच होते," ही गोष्ट मला आयुष्यात यशस्वी होऊनही साधे कसे रहावे, हे शिकवते.

कुसुमाग्रज आणि माझं नातं हे शब्दांचं आणि भावनेचं नातं आहे. ते कालही प्रस्तुत होते, आजूनही आहेत आणि उदयाही राहतील. जोपर्यंत मराठी भाषा जिवंत आहे आणि जोपर्यंत माणुसकीचा झरा वाहत आहे, तोपर्यंत कुसुमाग्रज प्रत्येक मराठी मनाच्या कुणाकुणात जिवंत राहतील. त्यांच्या साहित्याच्या वारसा पुढे नेणे आणि त्यांच्या विचारांप्रमाणे स्वाभिमानाने जगणे, हीच त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल.

'तुझ्या शब्दांतून लाभले आम्हाला, संघर्षाचे लेणे,
न भागावे कुणापुढे, स्वाभिमानाने जगणे.'
"विशाखा"ची ती वीज अन् 'नटसम्राट'चा तो श्वास,
मराठी मातीच्या कणाकणात, तुझाच सुवास.

'तू केवळ कवी नाहीस, तू विचारांचा हिमालय,
तुझ्या लेखणीने सजले, मराठीचे देवालय,
लढण्याची जिद्द अन माणुसकीची ती हाक,
'कुसुमाग्रज' नावाचे लेणे, काळजावर आहे कोरले लाख.'

नाव :- श्री. सुशिल रमेश होडबे
नगर दिवाणी व सत्र न्यायालय
मुंबई. 9324852663

नि-३८

# 'निबंध स्पर्धा'


संपूर्ण नाव – धनश्री धनंजय राजिगरे.

पदनाम – लिपिक–टंकलेखक

न्यायालय कमांक – न्यायालय क.9,
दिंडोशी विभाग, मुंबई.

भ्रमणध्वनी कमांक – 7757887572

नि ३८

# "आजच्या पिढीसाठी मराठी वाङ्मयाचे महत्त्व".....

'शब्दांच्या खेळातून, संस्कृतीचा ठेवा जपला जातो,
मराठी वाङ्मयाच्या पानापानांतून,
महाराष्ट्र माझा उलगडला जातो.'

आजच्या धावपळीच्या आणि तंत्रज्ञानाच्या युगात तरुण पिढीसाठी मराठी वाङ्मयाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. हे केवळ मनोरंजनाचे साधन नसून ते व्यक्तिमत्व विकासाचा एक भक्कम पाया आहे. मराठी साहित्याचे वाचन आजच्या पिढीसाठी केवळ फावल्या वेळचा छंद नसून, ते सर्वांगीण प्रगतीसाठी अत्यंत फायदेशीर आहे. आजच्या पिढीला आधुनिक काळात मराठी वाङ्मयाचे अनेक फायदे आहेत. मराठी साहित्याचे सर्वप्रथम महत्त्व म्हणजे, यातून आपला व्यक्तिमत्व विकास व भावनिक बुद्धिमत्ता वाढते. वाङ्मयाच्या विविध पात्रांच्या संघर्षातून तरुणांना इतरांच्या भावना समजून घेण्यास मदत होते. यामुळे सामाजिक प्रश्नांची जाण आणि मानवी स्वभाव समजण्याची क्षमता वाढते. दर्जेदार कथा किंवा कवितांचे वाचन केल्यामुळे तणाव कमी होतो आणि मनाला शांती मिळते. तसेच, नियमित वाचनामुळे शब्दसंग्रह वाढतो, ज्यामुळे संवाद साधण्याचे कौशल्य सुधारते आणि आत्मविश्वास वाढतो. विविध लेखनशैलींचा अभ्यास केल्यामुळे स्वतःचे विचार प्रभावीपणे मांडण्याची कला अवगत होते.

'अमृतानुभवाचा गोडवा, आणि अभंगांची गोडी,
मराठी साहित्याने लावली, जगण्याला एक नवी गोडी.'

मराठी साहित्याची सुरुवातच संतांच्या साहित्याने झाली, ज्याने 'माणुसकी'ची शिकवण दिली. संत ज्ञानेश्वरांचा 'अमृतानुभव' आणि संत तुकारामांचे 'अभंग', आजही हे साहित्य जनसामान्यांना नैतिक दिशा दाखवण्याचे काम करते. या वरील चारोळी प्रमाणे, मराठी साहित्य जगण्याला गोडवा आणते, तरुणांना त्यांच्या समृद्ध इतिहासाशी आणि महाराष्ट्राच्या सांस्कृतिक परंपरेशी जोडून ठेवते. कविता आणि कादंबऱ्या वाचल्यामुळे सर्जनशील विचार करण्याची क्षमता वाढते. मराठी साहित्य हे त्याच्या वैविध्यपूर्ण प्रकारांमुळे आणि समृद्ध परंपरेमुळे जगात वेगळे ठरते. मराठी साहित्याची प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे, मराठी साहित्याने केवळ मनोरंजन न करता समाजाला विचार करायला लावले आहे. यात जीवन जगण्याचे तत्त्वज्ञान आणि मानवी स्वभावाचे सूक्ष्म दर्शन घडते, उदाहरण द्यायचे झाले तर, 'वि. स. खांडेकर' यांची 'ययाति' या कादंबरीत माणसाची कधीही न संपणारी भोगलालसा आणि त्यातून येणारे दुःख यांचे अत्यंत प्रभावी चित्रण केले आहे.

आजच्या पिढीला मराठी वाङ्मयामुळे सामाजिक बांधिलकीचे महत्व समजते. समाजातील अन्याय, विषमता आणि शोषितांचे प्रश्न मांडणे हे मराठी साहित्याचे मोठे वैशिष्ट्य आहे. 'आण्णा भाऊ साठे' यांचे साहित्य किंवा डॉ. लक्ष्मण माने यांची 'उपरा' ही आत्मकथा यातून उपेक्षितांचे जीवन आणि त्यांचे प्रश्न जगासमोर आले.

मराठी साहित्याची दुसरी बाजु म्हणजे, मराठी साहित्यातील 'विनोद' हे केवळ हसण्याचे साधन नसून ते जीवनातील विसंगतीवर बोट ठेवण्याचे एक प्रभावी माध्यम आहे. मराठी विनोदी साहित्याची स्वतःची एक स्वतंत्र शैली आणि परंपरा आहे. 'पु.ल. देशपांडे' यांचे 'व्यक्ती आणि वल्ली' या विनोदी साहित्यातून आजच्या पिढीला मानवी स्वभावाचे विलोभनीय पैलू पाहता येतील. आजच्या डिजिटल युगात, जिथे सोशल मिडियामुळे भाषेची खोली कमी होत आहे, तिथे मराठी साहित्याचे महत्व 'दवा' आणि 'दुआ' या दोन्ही स्वरूपात आहे. आजची तरूण पिढी ही चॅटिंगच्या युगातील शॉर्टकट वापरणारी पिढी आहे. मराठी साहित्य वाचल्याने तरूणांना शब्दांची अचूक फेक आणि भाषेचा अलंकारिक गोडवा समजतो. तासनतास स्क्रीन पाहणाऱ्या डोळ्यांना आणि मनाला पु.लं.च्या विनोद एक वेगळीच शांतता देऊन जाते. हे साहित्य 'स्ट्रेस बस्टर' म्हणून काम करते.

जागतिकिकरणात आपली ओळख हरवु नये यासाठी ज्ञानेश्वरी पासून ते शिवाजी सावंत यांच्या कादंबऱ्यांपर्यंत प्रवास तरूणांना आपल्या मुळाशी जोडून ठेवतो. साने गुरूजींचे विचार आजही संयम शिकवतात. मराठी साहित्य माणसाच्या जगण्याचा कणा आहे. मराठी साहित्य आपल्याला माणूस म्हणून जगण्याची पध्दत शिकवते. जोतिराव फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि सावरकर यांच्या साहित्याने समाजातील अंधश्रध्दा आणि अन्यायावर प्रहार केला. आजही हे साहित्य तरूणांना पुरोगामी विचार करण्यासाठी प्रेरित करते. मराठी वाङ्मयाच्या वाचनामुळे कल्पनाशक्ती विस्फारते, संवादाचे कौशल्य सुधारते आणि कोणत्याही विषयावर सखोल विचार करण्याची क्षमता निर्माण होते. चांगल्या साहित्याचा वाचकच उद्याचा चांगला वक्ता, लेखक, किंवा विचारवंत बनू शकतो. साहित्य हे केवळ पुस्तकात नसते, ते जगण्याचे 'मर्म' आहे. आजच्या पिढीने जर मराठी वाङ्मयाचे वाचन केले ते आत्मसात केले, तर त्यांना स्वतःचीच एक नवी ओळख गवसेल....!

नि-११

**नाव** : मोहन सुरेश जयकारे
**कार्यालय** : नगर दिवाणी व सत्र न्यायालय मुंबई.
**पद आणि विभाग** : हमाल . लेखा विभाग

## (कायदा आणि मराठी भाषा : न्याय सर्वसामान्यांपर्यंत पोहचवण्याचे माध्यम)

**************************************************

'न्याय' ही संकल्पना जितकी उदात्त आहे, तितकीच ती सर्वसामान्यांसाठी सुलभ असणे गरजेचे आहे. लोकशाहीत कायद्याचे राज्य असते, पण जर तो कायदाच जनतेला आपल्या भाषेत समजला नाही, तर न्यायाची दारे त्यांच्यासाठी अर्धवट उघडल्यासारखीच राहतात. म्हणूनच, **कायदा आणि मराठी भाषा** यांचा जवळचा संबंध प्रस्थापित करणे, हे केवळ भाषिक प्रेम नसून तो एक महत्त्वाचा मानवाधिकार आहे. ब्रिटीश काळापासून भारतीय न्यायव्यवस्थेत इंग्रजी भाषेचे वर्चस्व राहिले आहे. उच्च न्यायालये आणि सर्वोच्च न्यायालयाचे कामकाज आजही प्रामुख्याने इंग्रजीत चालते. ग्रामीण भागातील एखादा शेतकरी जेव्हा कोर्टात उभा राहतो, तेव्हा त्याच्याच आयुष्याचा निर्णय घेणारे युक्तिवाद त्याला समजत नाहीत. जेव्हा न्यायदान अशा भाषेत होते जी सर्वसामान्यांना उमजत नाही, तेव्हा न्याय प्रक्रियेबद्दल त्यांच्या मनात भीती आणि अविश्वास निर्माण होतो. महाराष्ट्र राज्याची अधिकृत राजभाषा 'मराठी' आहे.

सद्यस्थिती महाराष्ट्रातील कनिष्ठ न्यायालयांमध्ये (जिल्हा आणि सत्र न्यायालये) मराठीतून कामकाज आणि निकाल देण्याचे प्रमाण वाढले आहे. केंद्र आणि राज्य सरकारचे अनेक महत्त्वाचे कायदे आता मराठीत उपलब्ध करून दिले जात आहेत तसेच एआय (AI) आणि भाषांतर सॉफ्टवेअरच्या मदतीने इंग्रजी निकालांचे मराठीत भाषांतर करण्याचे काम प्रगतीपथावर आहे. मराठीतून न्यायदान करताना काही तांत्रिक अडचणीही येतात. कायद्यातील अनेक इंग्रजी संज्ञांचे तंतोतंत मराठी प्रतिशब्द शोधणे आव्हानात्मक असते. यासाठी **विधी कोश** किंवा कायदेशीर शब्दसंग्रह अद्ययावत करणे गरजेचे आहे. तसेच, वकिली शिक्षणातही मराठीचा पर्याय अधिक सक्षमपणे उपलब्ध करून द्यायला हवा. केवळ न्यायालयाची भाषा मराठी असून चालणार नाही, तर **'कायद्याची साक्षरता'** मराठीतून होणे गरजेचे आहे. सरकारी योजना, जमिनीचे व्यवहार (सातबारा, फेरफार) आणि पोलिसांकडील तक्रार (FIR) या गोष्टी जेव्हा शुद्ध आणि सोप्या मराठीत असतात, तेव्हा सामान्य माणसाची फसवणूक होण्याचे प्रमाण कमी होते. नागरिकशास्त्राच्या पुस्तकातून मूलभूत कायद्यांची ओळख मराठीतून करून दिली, तर भविष्यातील पिढी अधिक सजग होईल. कायद्यात वापरली जाणारी मराठी अनेकदा खूप क्लिष्ट किंवा संस्कृतप्रचुर असते (उदा. 'प्रतिज्ञापत्र', 'अभिधन्स्त', 'वादपत्र'). ती अधिक **लोकभिमुख** करण्याची गरज आहे.

- इंग्रजीतील *'Affidavit'* ला 'शपथपत्र' म्हणणे अधिक सोपे वाटते.
- क्लिष्ट शब्दांऐवजी दैनंदिन वापरातील मराठी शब्दांचा वापर केल्यास कायद्याचा धाक न वाटता आपुलकी वाटेल.

सध्याची सर्वात मोठी गरज म्हणजे **मुंबई उच्च न्यायालयाचे** कामकाज मराठीत होणे. जरी काही निकाल आता मराठीत अनुवादित केले जात असले, तरी मुख्य युक्तिवाद आणि प्रक्रिया मराठीत झाल्यास ग्रामीण भागातील पक्षकारांना आपला खटला नक्की कोणत्या वळणावर आहे, हे प्रत्यक्ष समजेल. न्यायालयाच्या बाहेरही सर्वसामान्य माणसाचा कायद्याशी संबंध येतो, तो म्हणजे विविध करारांच्या माध्यमातून. आजही अनेकदा जमिनीचे व्यवहार किंवा भाडेकरार इंग्रजीत केले जातात, जे सामान्य माणसाला पूर्ण समजत नाहीत. हे दस्तऐवज मराठीत असणे सक्तीचे केल्यास फसवणुकीचे प्रकार थांबतील तसेच शासनाचे निर्णय सोप्या मराठीत प्रसिद्ध होणे गरजेचे आहे, जेणेकरून त्यातील तांत्रिक अटींमुळे सामान्य जनता लाभांपासून वंचित राहणार नाही.

न्यायव्यवस्थेची पहिली पायरी म्हणजे 'पोलीस ठाणे'. गुन्हा दाखल करताना तो तक्रारदाराच्या शब्दांत आणि मराठीतच नोंदवला जातो. मात्र, त्यातील कलमांची माहिती (उदा. आयपीसी/भारतीय न्याय संहिता) देताना ती मराठीत समजावून सांगितली, तर तक्रारदाराला आपल्या केसचे गांभीर्य समजते. तसेच घटनास्थळाचा पंचनामा करताना वापरली जाणारी भाषा जर स्थानिक मराठी असेल, तर साक्षीदारांना आपली साक्ष न्यायालयात टिकवून ठेवणे सोपे जाते. महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात आजही तंटाबंदी किंवा स्थानिक स्तरावर वाद मिटवले जातात. लोकन्यायालयामध्ये संवाद हा मराठीतच होतो, म्हणूनच तिथे प्रलंबित प्रकरणे लवकर निकाली निघतात. हाच 'संवादाचा पॅटर्न' मोठ्या न्यायालयांनी स्वीकारणे गरजेचे आहे. ग्रामसभेचे ठराव आणि त्यातील

कायदेशीर तरतुदी मराठीत असल्यामुळे गावकरी आपल्या हक्कांसाठी अधिक सक्षमपणे लढू शकतात.

आजच्या काळात **कृत्रिम बुद्धिमत्ता (AI)** मोठी भूमिका बजावू शकते. सर्वोच्च न्यायालयाने 'सुवास' (SUVAS) नावाचे सॉफ्टवेअर विकसित केले आहे, जे कायदेशीर कागदपत्रांचे प्रादेशिक भाषांत रूपांतर करते. अशा तंत्रज्ञानाचा वापर वाढल्यास भाषेचा अडथळा पूर्णपणे दूर होऊ शकतो. न्यायाधीशांनी आपले निकाल सोप्या मराठीत लिहिल्यास आणि वकिलांनी आपल्या अशिलाला त्याच्या भाषेत कायद्याच्या तांत्रिक बाजू समजावून सांगितल्यास, न्याय खऱ्या अर्थाने घराघरात पोहोचेल. मराठी भाषा ही केवळ संवादाची भाषा नाही, तर ती न्यायाची भाषा बनणे ही काळाची गरज आहे. जेव्हा एखादा सामान्य माणूस न्यायालयात आत्मविश्वासाने आपली मातृभाषा बोलू शकेल, तेव्हाच लोकशाहीतील 'न्याय' हा शब्द खऱ्या अर्थाने अर्थपूर्ण ठरेल. कायदा ही काही मूठभर लोकांची मक्तेदारी नसून ती समाजाचे रक्षण करणारी ढाल आहे. ही ढाल तेव्हाच प्रभावी ठरेल जेव्हा सर्वसामान्यांना तिचा वापर आणि अर्थ समजेल. मराठी भाषेच्या माध्यमातून जेव्हा कायद्याचे ज्ञान घराघरात पोहचेल, तेव्हाच खऱ्या अर्थाने 'न्याय सर्वांसाठी' हे ब्रीदवाक्य सार्थ ठरेल.

*****

नि-१

संपूर्ण नाव - कु. श्वेता हरेश मुळम
पदनाम - लिपिक- टंकलेखक (कंत्राटी कर्मचारी)
विभागाचे नाव - सरकारी वकील, नगर दिवाणी न्यायालय, मुंबई
भ्रमणध्वनी क्र. ९८७९९२८४९३

# निबंध स्पर्धा लेखन

## कायदा आणि मराठी भाषा: न्याय सामान्यांपर्यंत पोहोचवण्याचे प्रभावी माध्यम

न्याय हा लोकशाही व्यवस्थेचा आत्मा मानला जातो. समाजातील प्रत्येक व्यक्तीला न्याय मिळणे हा तिचा मूलभूत हक्क आहे. मात्र न्यायव्यवस्था, कायदे आणि नियम अनेकदा गुंतागुंतीच्या भाषेत मांडलेले असल्यामुळे सामान्य माणसाला ते समजणे कठीण जाते. अशावेळी मराठी भाषा ही कायदा आणि सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवण्याचे अत्यंत प्रभावी माध्यम ठरते.

"अन्यायाची होते भाषा जिथे परकी आणि क्लिष्ट,
तिथे सामान्यांचे जगणे होते अधिकच कठीण आणि स्पष्ट."

लोकशाहीच्या तीन स्तंभांपैकी 'न्यायव्यवस्था' हा सर्वात महत्त्वाचा आधारस्तंभ मानला जातो. पण या स्तंभाचा आधार सामान्यांना तेव्हाच वाटेल जेव्हा त्यातील शब्द आणि प्रक्रिया त्यांना आपल्या वाटतील. आज आपल्या देशात कायद्याचे राज्य आहे, पण दुर्दैवाने या कायद्याची भाषा आजही बहुतांश इंग्रजीच आहे. महाराष्ट्राच्या मातीत जन्मलेल्या प्रत्येक नागरिकासाठी 'मराठी' ही केवळ संवादाची भाषा नाही, तर ती त्याच्या अस्तित्वाची ओळख आहे. म्हणूनच, कायदा आणि मराठी भाषा यांचा संगम होणे ही काळाची गरज आहे.

Sundaram
FOR EDUCATIONAL USE

"ज्याला कायदा समजतो, त्यालाच न्याय मिळतो",
असे म्हटले जाते. लोकशाहीमध्ये न्यायव्यवस्था हा महत्त्वाचा स्तंभ आहे, परंतु हा स्तंभ सर्वसामान्यांसाठी तेव्हाच मजबूत देणारा ठरतो, जेव्हा त्या व्यवस्थेची भाषा समजणारी असते. महाराष्ट्राच्या संदर्भात विचार केला, तर मराठी भाषा ही केवळ संवादाचे साधन नसून ती न्याय व हक्क मिळवून देण्याचे एक प्रभावी माध्यम आहे.

भारत हा बहुभाषिक देश असून महाराष्ट्रात मराठी ही प्रमुख व मातृभाषा आहे. राज्यघटनेने प्रत्येक नागरिकाला समतेचा व न्यायाचा अधिकार दिला असला, तरी तो अधिकार समजण्यासाठी भाषा महत्त्वाची भूमिका बजावते. जर कायदे, नियम, न्यायालयीन प्रक्रिया आणि निर्णय मराठी भाषेत मांडले गेले, तर सामान्य नागरिकांना त्यांचा अर्थ सहजपणे समजतो. यामुळे लोकांमध्ये कायद्या-विषयी जागरुकता वाढते आणि अन्यायाविरुद्ध आवाज उठवण्याचे धैर्य निर्माण होते.

आज अनेक नागरिक न्यायालय, पोलीस ठाणे किंवा शासकीय कार्यालयांमध्ये जाण्यास घाबरतात, कारण तेथे वापरली जाणारी भाषा त्यांना अपरिचित असते. इंग्रजी किंवा अवघड कायदेशीर शब्दांमुळे ते स्वत:चे म्हणणे नीट मांडू शकत नाहीत. अशा परिस्थितीत मराठी भाषेचा वापर केल्यास संवाद सुलभ होतो आणि न्यायप्रक्रिया अधिक लोकाभिमुख बनते. जोपर्यंत कायद्याचे क्लिष्ट शब्द मराठीच्या सोप्या प्रवाहात मिसळत नाहीत, तोपर्यंत सामान्यांसाठी 'न्याय' म्हणजे केवळ तारखांचा खेळ ठरतो.

मराठी भाषेतून कायदे समजावून सांगण्यासाठी वर्तमानपत्रे, दूरदर्शन, सामाजिक माध्यमे, कायदेविषयक शिबिरे व जनजागृती कार्यक्रम महत्त्वाची भूमिका बजावत

Sundaram®
FOR EDUCATIONAL USE

तसेच मराठीमध्ये कायदेविषयक पुस्तके, मार्गदर्शक आणि ऑनलाईन माहिती उपलब्ध झाल्यामुळे सामान्य स्वतःचे हक्क आणि कर्तव्य ओळखु लागला आहे. "कायद्याचे अज्ञान माफी नाही" ही संकल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी मराठी भाषेचा मोठा उपयोग होतो.

"न्याय हा केवळ झाला पाहिजे असे नाही, तर तो होताना दिसलाही पाहिजे." हे तत्व तेव्हाच सार्थ ठरते जेव्हा न्यायाची भाषा ही 'जनांची भाषा' असते. लोकशाहीच्या मंदिरात जेव्हा एखादा सामान्य माणूस न्यायाच्या आशेने येतो, तेव्हा त्याला तिथे परकी भाषेचा अडथळा न येता आपल्या मायबोलीचा आधार मिळणे, हा त्याचा मूलभूत अधिकार आहे. 'कायदा आणि मराठी भाषा' हे नाते केवळ भाषेचे नसून ते न्यायाच्या सुलभीकरणाचे आहे.

न्याय हा केवळ कागदावर असून चालत नाही, तर ते लोकांच्या मनात उतरला पाहिजे. तोपर्यंत कायद्याची भाषा जनसामान्यांची भाषा होत नाही, तोपर्यंत खऱ्या अर्थाने "न्यायाचे विकेंद्रीकरण" होणार नाही. मराठी भाषा ही छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळापासून स्वराज्याच्या कारभाराची भाषा राहिली आहे. आजच्या लोकशाहीतही 'न्याय' हा शेवटच्या माणसापर्यंत पोहचला पाहिजे.

शेवटी, कायदा हा सामान्यांचे रक्षण करण्यासाठी असतो, त्यांना गोंधळात टाकण्यासाठी नाही. जोपर्यंत सर्वोच्च न्यायालयाचे न्यायनिवाडे आणि संसदेचे कायदे मराठीत अनुवादित होवून घराघरात पोहचत नाहीत, तोपर्यंत 'न्याय' हा शब्द शब्दकोशापुरताच मर्यादित राहील.

'मराठी पाऊल पडते पुढे' हे केवळ घोषणा वाक्य न रहता, जेव्हा ते न्यायालयाच्या निकालपत्रावर उमटेल, तेव्हाच खऱ्या अर्थाने 'न्याय सर्वांसाठी' हे स्वप्न पूर्ण होईल.

Sundaram®
FOR EDUCATIONAL USE

न्याय हा रंजल्या- गांजल्यासाठी असतो, सुशिक्षित वर्गाच्या बौद्धिक व्यायामासाठी नाही. न्यायदेवतेच्या डोळ्यावरची पट्टी ही पक्षपातीसाठी नसते, पण ती भाषेच्या अंधकारामुळे निर्माण होवू नये. कायदयाची मराठी भाषा म्हणजे न्यायाच्या मंदिरात पेटवलेली एक 'नंदादिप' आहे, जी सामान्य माणसाला त्यांच्या हक्कांचा मार्ग दाखवेल.

"मराठीतून मिळेल न्याय, तरच वाढेल लोकशाहीची
साखरेची गोडी,
अन्यायाविरुद्ध लढायला मग प्रत्येकाला येईल नवी
उभारी आणि गोडी!"

जेव्हा न्यायालयाच्या निकालपत्रावर शिवरायांच्या महाराष्ट्राची 'मराठी' मोहोर उमटेल, तेव्हाच खऱ्या अर्थाने 'न्याय सर्वांसाठी' हे स्वप्न साकार होईल.

जय हिंद । जय महाराष्ट्र !

Sundaram®

FOR EDUCATIONAL USE

श्री. प्रविण बा. दळवी.
कोर्ट- क्र-२८
पद - शिपाई
9223340872.

नि-३२

# मराठी शाळा टिकवण्यासाठी पालकांची भूमिका.

माझा मराठीची बोलू कौतुके। परि अमृतातेहि
पैजा जिंके। ऐसी अक्षरे रसिके मेळवीन॥

या ज्ञानोबांनी रचिलेल्या ओव्या आपल्या संपन्न मराठी संस्कृती व अस्मितेची आठवण करुन देतात. या ओव्या प्रत्येक मराठी माध्यमातून शिकलेल्या व्यक्तीला ज्ञात आहेत पाठ आहेत. परंतु सध्याच्या पिढिचा इंग्रजी माध्यमा कडे वाढता कल पहाता. महाराष्ट्राची संस्कृती, अस्मिता आणि भाषा टिकवण्यासाठी मराठी शाळांचे अस्तित्व टिकून रहाणे अत्यंत आवश्यक आहे.

इंग्रजी भाषेने समाजात घातलेली भूरळ, कमी पटसंख्या आणि पायाभूत सुविधांचा अभाव यामुळे मराठी शाळा बंद पडत चालल्या आहे. या शाळा वाचवण्यासाठी शिक्षण गुणवत्ता सुधारणे तंत्रज्ञानाचा वापर आणि पालकांमध्ये जनजागृती करणे ही काळाची गरज आहे. ज्या मुळे आपली संस्कृती समाजाच्या सर्व स्तरांमध्ये टिकून राहील.

मराठी शाळा ही मराठी भाषेचा कणा आहे. जर मराठी शाळा टिकल्या तर मराठी भाषा टिकेल, मराठी भाषा टिकली तर मराठी संस्कृती टिकेल आणि मराठी संस्कृती टिकली तर मराठी अस्मिता टिकेल. मराठी शाळा बंद पडल्यास भाषेचे, संस्कृतीचे व अस्मितेचे अस्तित्व धोक्यात येईल व या महाराष्ट्रातच काय या भारतातून मराठी इतीहास जमा होईल.

मराठी शाळा टिकवण्यासाठी पालकांनी पुढाकार घेण्याची आवश्यकता आहे. सोबतच पालकांना शाळांनी पाठबळ देण्याची आवशक्ता आहे. पालकांनी आपल्या पाल्यांना मराठी शाळेत प्रवेश

# मराठी शाळा टिकवण्यासाठी पालकांची भूमिका.

माझा मराठीची बोलू कौतुके। परि अमृतातेहि
पैजा जिंके। ऐसी अक्षरे रसिके मेळवीन ।।

या ज्ञानोबांनी रचिलेल्या ओव्या आपल्या संपन्न मराठी संस्कृती व अस्मितेची आठवण करुन देतात. या ओव्या प्रत्येक मराठी माध्यमातून शिकलेल्या व्यक्तीला ज्ञात आहेत पाठ आहेत. परंतु सध्याच्या पिढिचा इंग्रजी माध्यमा कडे वाढता कल पहाता महाराष्ट्राची संस्कृती, अस्मिता आणि भाषा टिकवण्यासाठी मराठी शाळांचे अस्तित्व टिकून रहाणे अत्यंत आवश्यक आहे.

इंग्रजी भाषेने समाजात घातलेली भूरळ, कमी पटसंख्या आणि पायाभूत सुविधांचा अभाव यामुळे मराठी शाळा बंद पडत चालल्या आहे. या शाळा वाचवण्यासाठी शिक्षण गुणवत्ता सुधारणे तंत्रज्ञानाचा वापर आणि पालकांमध्ये जनजागृती करणे ही काळाची गरज आहे. ज्या मुळे आपली संस्कृती समाजाच्या सर्व स्तरांमध्ये टिकून राहील.

मराठी शाळा ही मराठी भाषेचा कणा आहे. जर मराठी शाळा टिकल्या तर मराठी भाषा टिकेल, मराठी भाषा टिकली तर मराठी संस्कृती टिकेल आणि मराठी संस्कृती टिकली तर मराठी अस्मिता टिकेल. मराठी शाळा बंद पडल्यास भाषेचे, संस्कृतीचे व अस्मितेचे अस्तित्व धोक्यात येईल व या महाराष्ट्रातच काय या भारतातून मराठी इतीहास जमा होईल.

मराठी शाळा टिकवण्यासाठी पालकांनी पुढाकार घेण्याची आवश्यकता आहे. सोबतच पालकांना शाळांनी पाठबळ देण्याची आवशक्ता आहे. पालकांनी आपल्या पाल्यांना मराठी शाळेत प्रवेश घेतल्यास मराठी शाळांन वर अधीक जबाबदारी वाढते. त्यासाठी मराठी शाळांनी आपला दर्जा उंचावून, डिजिटल लॅब, संगणक प्रशिक्षण, आधुनिक

सुविधा पुरवणे गरजेचे आहे.

मुळाच भाषेने संस्कृतीने जन्माने ~~असल~~ मराठी असलेले पालक आपल्या पाल्यांना इंग्रजी माध्यमातून शिकवण्यास आग्रही का? या प्रश्नाचे उत्तर म्हणजे स्वत:ची नोकरी किंवा व्यावसाय टिकवण्यासाठी असलेली इंग्रजी भाषेची गरज. अनेक पालकांना मुलगा मराठी शाळेत शिकल्यास मागे पडेल अशी भिती वाटते मात्र पालकांनी हा न्यूनगंड सोडून मराठी भाषेचा सार्थ अभिमान बाळगायला हवा. या महत्वाच्या विषयावर मराठी शाळांनी लक्ष केंद्रीत करून इंग्रजी हा विषय पाल्याच्या प्रगती पुस्तकात शंभर गुणांचा नठेवाता तो विषय अस्खलीतपणे वाचण्याचा, बोलण्याचा, संवाद साधण्याचा व लिहीण्याचा आहे यासाठी सक्तीचा करावा.

मराठी शाळांमधून विद्यार्थ्यांना आपल्या परंपरा आणि सण-उत्सवांची ओळख करून दिली जाते. पालकांनी अशा उपक्रमांना प्रोत्साहन दिल्यास मुलांना आपल्या मुळांची जाणीव राहते. पालकांची जबाबदारी केवळ प्रवेश घेऊन संपतनाही. वेळोवेळी शालेय उपक्रमात भागघ्यावा मराठी शाळांमधील गुणवत्तेवर लक्ष देऊन पालकांनी शाळा व्यावस्थापन समितीत सक्रिय सहभाग घेतला पाहिजे. शैक्षणिक संस्थांना आर्थिक चणचण भासू न देता त्यांना सढळ हस्ते मदत करावी ज्या कारणाने मराठी शाळा आपला दर्जा उंचावतील.

"मराठी पाऊल पडते पुढे" असे आपण अभिमानाने म्हणतो, परंतु आजच्या जागतिकीकरणाच्या युगात मराठी-शाळांची व मराठी पाल्यांची बिकट अवस्था होऊ न देता. पालकांनी व मराठी शाळांनी एकत्र येऊन प्रयत्न करणे गरजेचे आहे. मातृभाषेतून शिक्षण घेण्यासाठी चळवळ निर्माण करण्याची गरज आहे. मराठी शाळा टिकवण्यासाठी पालकांची भूमिका कळीची ठरते. मराठी शाळा टिकवणे ही केवळ सरकारची किंवा शिक्षकांची जबाबदारी नसून ती प्रत्येक मराठी पालकाची नैतिक जबाबदारी आहे. पालकांनी जागरूक राहून मराठी शाळांची निवड केली तर मराठी भाषा व मराठी संस्कृतीशी आपल्या मुलांची नाळ जोडली जाईल.

नि-२१

नाव : विनया विनीत मोहिते
पदनाम : दुभाषी (इंटरप्रिटर),
कोर्ट क्रमांक : ८३ (माझगाव)
मो. क्रमांक : ७७०००४२६२०

कायदा आणि मराठी भाषा
न्याय सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवण्याचे माध्यम

" माझा मराठीची बोलू कौतुके |
परि अमृतातेहि पैजासी जिंके ||"

संत ज्ञानेश्वर महाराजांची ही ओवी ऐकली की, मराठी भाषेचा सार्थ अभिमान आणि गोडवा जाणवतो, ज्या भाषेपुढे अमृतहि फिके पडते. अशा या मराठी भाषेचे कौतुक करावे तितके कमीच आहे.

आज महाराष्ट्र शासन दरबारी न्यायालयीन कर्मचारी म्हणून काम करत असताना, महाराष्ट्र शासनाने विविध विभागांच्या कामकाजात मराठी भाषेचा वापर अनिवार्य करण्यासाठी घेतलेले शासन निर्णय खुप मोलाचे वाटतात. त्यापैकी एक म्हणजे महाराष्ट्र राजभाषा अधिनियम १९६४ अंतर्गत २६ जानेवारी १९६५ पासून मराठी ही राज्याची अधिकृत राजभाषा म्हणून लागू करण्यात आली आहे. वसंतराव नाईक सरकारने मराठीला राजभाषेचा दर्जा देणारा कायदा केला, त्यानुसार सर्व शासकीय कामकाज मराठी भाषेत करणे अनिवार्य करण्यात आले. तसेच केंद्र सरकारने मराठीला दिलेला "अभिजात भाषेचा" दर्जा हि महाराष्ट्रासाठी खुप अभिमानाची गोष्ट आहे.

नगर दिवाणी व सत्र न्यायालयात काम करत असताना अनुभवास आलेली एक गोष्ट म्हणजे येथील सर्व कामकाज हे इंग्रजी भाषेतुन केले जाते. वाढती गुन्हेगारी तसेच विविध फसवणुकीचे प्रकार यांमुळे दिवाणी स्वरूपाचे व गुन्हेगारी स्वरूपाचे देशभरात एकुण अंदाजे ४,८२,६२,७९६ दावे प्रलंबित असल्याचे NJDG

Sundaram
FOR EDUCATIONAL USE

(National Judicial Data Grid) या न्यायालयीन संकेतस्थळावरून कळले. बऱ्याचदा वादी आणि प्रतिवादी हे अशिक्षित किंवा कमी शिक्षीत असल्यामुळे तसेच कायदेशीर ज्ञानाच्या कमतरतेमुळे बऱ्याच पक्षकारांचे नुकसान होते. जसे कि, दावा निकाली काढण्यात जास्त वेळ लागणे, दाव्यात मागणी केलेल्या रकमेपेक्षा जास्त वकिलांची फि भरावी लागणे, काही वेळेला काही वकिलांकडून पक्षकारांची केलेली दिशाभूल, काही कार्यालयीन कार्यपध्दतीत लागणारा वेळ, तसेच कायदेशीर ज्ञानाच्या अभावामुळे न्यायाधीशांनी केलेल्या आदेशाचा अर्थ न समजणे यामुळे बऱ्याच पक्षकारांचे दावे दीर्घकाळ प्रलंबित राहतात. हे टाळण्यासाठी आपल्या कार्यालयीन कामकाजात सुध्दा मराठी भाषेचा जास्तीत जास्त वापर होणे गरजेचे आहे.

CIS (Case Information System) द्वारे प्रत्येक तारखेला न्यायाधीशांनी दिलेला आदेश CIS प्रणालीमध्ये अपलोड करणे तसेच दिनांक ०३ फेब्रुवारी, २०२५ चे शासन परिपत्रक क्रमांक - संकीर्ण - ४०२४/ प्र.क्र. ४२८/का. १४२१ (GR) नुसार न्यायालयातील दाव्यांचे निकाल मराठी भाषेतुन देण्यात यावे हे सरकारचे निर्णय खुपच कौतुकास्पद आहेत. निकाल मराठी भाषेतुन देण्यामुळे पक्षकारांना कायदेशीर भाषेच ज्ञान मराठीतून मिळेल. या उपाययोजनेमुळे पक्षकारांना न्यायाधीशांनी केलेल्या आदेशाचा अर्थ समजेल आणि यानंतर कोणती कार्यवाही करणे गरजेचे आहे हे लक्षात येईल. यामुळे दावे प्रलंबित राहणे टळतील आणि कमी कालावधीत निकाली काढले जातील. तसेच वकिलांकडून अशिक्षीत किंवा कमी शिक्षीत असलेल्या पक्षकारांची दिशाभूल होण्यासही आळा बसेल.

याचप्रमाणे न्यायालयीन व्यवस्थेत काम करताना निदर्शनास आलेली गोष्ट म्हणजे या क्षेत्रात काम करणारे अनेक व्यक्ती जसे की, न्यायाधीश, सर्व न्यायालयीन कर्मचारी, वकिल तसेच पोलिस अधिकारी हे वेगवेगळ्या पंथाचे, प्रांताचे, वेगवेगळ्या भाषा बोलणारे असतात. म्हणुनच न्यायालयीन कामकाजात मराठी भाषेची व्याप्ती वाढविण्यासाठी या क्षेत्राशी निगडीत असलेल्या प्रत्येकाने स्व-प्रयत्नांनी मराठी भाषा

Sundaram

FOR EDUCATIONAL USE

शिकुन घेण्याचा उत्साह दाखवावा. विशेषत: अमराठी न्यायालयीन कर्मचारी आणि वकिलांनी. याचे कारण असे की, न्यायालयीन कर्मचारी आणि वकिल हे पक्षकार आणि न्यायाधीश यांना जोडणारा महत्त्वाचा दुवा असतात. पक्षकारांचे म्हणणे योग्य आणि उचित शब्दांत मांडणे हि वकिलांची जबाबदारी असते तर न्यायाधीशांचे म्हणणे पक्षकारांना आणि वकिलांना समजावून सांगणे हि न्यायालयीन कर्मचाऱ्यांची जबाबदारी असते. योग्य माहितीच्या देवाण-घेवाणी वर न्यायाधीशांनी एखाद्या खटल्यात दिलेले निर्णय अवलंबून असतात. म्हणुनच न्यायालयीन कामकाज सुरळीत पार पाडण्यासाठी प्रत्येक अमराठी व्यक्तीने मराठी भाषा शिकुन घेण्याचा प्रयत्न करावा, तेव्हाच आपले एक पाऊल प्रगतीच्या दिशेने पडेल.

आशा करुया, न्यायालयात न्यायाची दाद मागण्यासाठी येणाऱ्या प्रत्येक सर्वसामान्य नागरिकासाठी मराठी भाषेतुन केलेले कामकाज एक संजीवनी ठरेल आणि खऱ्या अर्थाने न्याय तळागाळातील सर्वसामान्यांपर्यंत पोहोचेल.

"धर्म, पंथ, जात, एक मानतो मराठी"

Sundaram®

FOR EDUCATIONAL USE